# लॉन्ड्री व्यवसायिकांना स्वस्त दरात वीज
## उर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रयत्नांना यश

मुंबई, दि. 04 ऑक्टोबर, 2018 :-

राज्यातील लॉन्ड्री व्यवसायिकांना दि. 01 सप्टेंबर 2018 पासून 6 रुपये 6 पैसे प्रतियुनिट या स्वस्त दराने वीज मिळणार आहे. लॉन्ड्री व्यावसायिकांनी वीजदर कमी करण्याबाबत ऊर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले होते. याबाबत ऊर्जामंत्री यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश लाभल्यामुळे लॉन्ड्री व्यावसायिकांनी ऊर्जामंत्र्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच जे लॉन्ड्री व्यावसायिक राहत्या ठिकाणी व्यवसाय करतात त्यांनाही घरगुती वीजदर लागू करण्यात आले आहेत.

धोबी / लॉन्ड्री व्यावसायिकांना यापूर्वी वाणिज्यिक दराने वीज आकारणी केली जात होती. त्यामुळे या व्यावसायिकांना प्रतियुनिट 10 रुपये 50 पैसे या दराने वीज आकारणी होत होती. याबाबत लॉन्ड्री व्यावसायिकांनी ऊर्जामंत्र्यांना निवेदन देऊन सवलतीच्या दरात वीज देण्याची मागणी केली होती. अन्यथा हा व्यवसाय मोडकळीस येईल, हेही निदर्शनास आणून दिले होते. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन ऊर्जामंत्र्यांनी त्याबाबत योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन धोबी / लॉन्ड्री व्यावसायिकांना दिले होते.

महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने लॉन्ड्री उद्योगाला दि. 1 सप्टेंबर 2018 औद्योगिक दराने वीज आकारणी करण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे आता या व्यावसायिकांना 6 रुपये 6 पैसे प्रतियुनिट या दराने वीज मिळणार आहे. तसेच जे लॉन्ड्री व्यावसायिक राहत्या ठिकाणी व्यवसाय करतात त्यांनाही घरगुती वीजदर लागू करण्यात आला आहे. हे विजेचे दर 0 ते 100 युनिटकरिता रु. 4.30 प्रतियुनिट व 101 ते 300 युनिटकरिता रु. 8.03 प्रतियुनिट असे आहेत.

या निर्णयांमुळे धोबी / लॉन्ड्री व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी राज्यांचे ऊर्जामंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन केले आहे.

दूरध्वनी क्र. 26474211,
विस्तार क्र. 3617.

उपमुख्य जनसंपर्क अधिकारी

MSEDCL